महाराष्ट्र शासन

# शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन,तासगांव

## मणेराजूरी रोड, तासगांव ४१६ ३१२

राष्ट्रोध्दाराय तंत्रशिक्षणम

दुरध्वनी क्र. ०२३४६-२५०४४८

E-mail ID : principal.grwptasgaon@dtemaharashtra.gov.in

जा.क्रं. शानिमतंनिता /ग्रंथालय/२०२२-२३ / 23 दि. 11/11/2022.

प्रति,

**मा.व्यवस्थापक.**

---------------------

---------------------

---------------------

**विषय:- सन २०२२-२३करीता या संस्थेत पुस्तके खरेदीसाठी मोहरबंद निविदा (Quotations) मागविण्याबाबत...**

**महोदय,**

सन **२०२२-२३** करीता पदविका अभ्यासक्रमाची (Diploma Engineering) पुस्तके पुरविण्याकरीता बंद पाकिटातून मोहरबंद निविदा दि. २१/११/२०२२ पूर्वी किंवा सदरील दिवशी सांय. ४.०० वाजेपर्यंत पाठवाव्यात. मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील. बंद पाकीटावर " पुस्तके पुरविण्याकरीता निविदा " असे स्पष्ट अक्षरात लिहावे. सदर निविदा खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून भरावयाच्या आहेत.

१) सदर निविदाचा कालावधी ३१/०३/२०२३ पर्यंत अमलात राहील. पुस्तके नवीन आवृत्तीची पुरवावी लागतील.

२) पुस्तकांच्या किंमती रूपयात असाव्यात. पुस्तकांच्या किंमती परकीय चलनात असल्यास त्यांचे भारतीय रूपयात रूपांतर करून देण्यात यावे. त्यांच्या विनिमयाचा दर नमुद करावा. पुस्तकांच्या किंमतीचे Price proof सादर करावे लागतील.

3) भारतीय प्रकाशने व परदेशी प्रकाशनावर आपण किती टक्के सुट (Discount) देऊ शकाल, ते वेगवेगळे नमूद करावे. प्रकाशन निहाय दर्शवलेली सुट (Discount) सुचिविल्यास ती निविदा स्विकारली जाणार नाही. पुस्तके स्वखर्चाने पोहोच करावे लागतील. पॅकींग फॉरवडींग चार्जेस दिले जाणार नाहीत. पब्लिशर्स कॅटलॉग कोटेशन्स् सोबत पाठवावेत.

4) पुरवठा आदेश पोहोचल्यावर आपणांस ०८ दिवसात पुस्तकांचा पुरवठा करावा लागेल. सदरील मुदतीत पुस्तके पुरवठा न केल्यास अ.क्रं. २ वरील पुरवठादारास पुस्तके पुरविण्याबाबत कळविले जाईल.

5) आवश्यक भासल्यास मंजूर करण्यात आलेल्या निविदाधारकास पुस्तकांचे प्रदर्शन स्वताःच्या खर्चाने व संस्थेत भरवावे लागेल.

६) कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क राखून ठेवण्यात आलेला आहे.

७) सदर निविदाच्या अटी व शर्ती या संस्थेच्या www.grwptasgaon.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

**या सर्व अटी मान्य असल्यास Quotation भरण्यात यावे व सदर पुस्तके वेळेत पुरवठा करण्यात यावीत.**

**डॉ संजय अ. परदेशी**

**प्राचार्य**

**शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव.**

प्रत:- १) मुख्य सुचनाफलक.

२) श्री भोसले एस.एस. अधि माहिती तंत्रज्ञान - संस्थेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेसाठी.

# <u>निविदा सुचना</u>

या संस्थेच्या पदविका अभ्यासक्रमाची (Diploma Engineering) ग्रंथालयात पुस्तके खरेदी करण्याकरिता अधिकृत पुस्तके विक्रेत्याकडून निविदा मागवण्यात येत आहेत. सदर निविदाच्या अटी व शर्ती या संस्थेच्या **www.grwptasgaon.ac.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. पुस्तके पुरविण्याकरिता मोहरबंद निविदा बंद पाकिटातून दि.२१/११/२०२२ पुर्वी किंवा सदरील दिवशी दुपारी ४-०० वाजेपर्यंत पाठवाव्यात. अधिक माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा संस्थेच्या संकेत स्थळाला भेट द्यावी.

**डॉ. संजय अ. परदेशी**

**प्राचार्य**

**शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव.**